ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २१ | पुणें, बुधवार तारीख २७ जुलै, १९५५ | अंक ३०

## विविध माहिती

**हस्तनिर्मित कागदाचा धंदा**—उत्तर-प्रदेशांत हातानें बनविण्यांत येणाऱ्या कागदाच्या धंद्याचा विकास करण्यासाठी भारतीय सरकारनें चालू आर्थिक वर्षांत १६,००० रुपयांची मदत देण्याचें ठरविलें आहे. धंद्याला लागणाऱ्या साधनांची जुळणी करण्यासाठी लागणाऱ्या रकमेपैकी निम्मी रक्कम वरील रकमेंतून खर्च करण्यांत येईल. बाकीचा खर्च राज्य सरकार करील.

**अमेरिकेंत अणुशक्तीनें विजेचें उत्पादन**—अमेरिकेंत अणुशक्तीच्या साह्यानें वीज उत्पन्न करणाऱ्या पहिल्या केंद्राचें उद्घाटन नुकतेंच करण्यांत आलें. ह्या केंद्रांत अणुशक्तीचा उपयोग करून १०,००० किलोवॅट वीज निर्माण करण्यांत येत आहे. केंद्रासाठी लागणारी यंत्रसामुग्री जनरल इलेक्ट्रिक कंपनीनें तयार केलेली आहे.

**मध्यभारत सरकारची सूचना**—मध्यभारत सरकारचे सेक्रेटरी श्री. वी. जी. राव ह्यांनीं असा हुकूम काढला आहे कीं, सरकारी कामकाजासाठी हिंदी भाषेचा उपयोग करण्यांत यावा. निरनिराळ्या खात्यांतर्फे निघणारीं सर्क्युलर्स आणि खात्यांच्या दरम्यान चालणारा पत्रव्यवहार हिंदींतून करण्यांत यावा, असें हुकुमांत सुचविण्यांत आलें आहे.

**विंध्य प्रदेशांतील भूदान**—विंध्य प्रदेशांत दतिआ जिल्ह्यांत राओरी नांवाचें एक खेडें आहे. ह्या खेड्यांतील शेतकऱ्यांनीं आपली ९५० एकर जमीन राज्य-भूदान समितीला दान म्हणून दिली आहे. खेड्यांत सुमारें १२० कुटुंबें राहतात आणि सर्व मिळून ३,७४४ रुपये वार्षिक सारा भरतात. दान देण्यांत आलेली सर्व जमीन अतिशय सुपीक आहे.

**जगांतील कॅथॉलिक धर्मीयांची संख्या**—सर्व जगांत मिळून कॅथॉलिक धर्मपंथीयांची संख्या सुमारें ४८ कोटी असावी असा अंदाज करण्यांत आला आहे. ब्राझिलमध्यें सर्वांत अधिक म्हणजे ४·८ कोटी कॅथॉलिक आहेत. त्यानंतर इटलींत ४·७५ कोटी आणि फ्रान्समध्यें ३·५ कोटी कॅथॉलिक आहेत. युरोप-मधील कॅथॉलिकांची संख्या २३ कोटी आहे.

**नेपाळमधील टेलिफोन एक्सचेंज**—भारतीय सरकारच्या टेलिफोन खात्यानें नेपाळमध्यें टेलिफोन एक्सचेंज उभारला आहे. त्याचें उद्घाटन नुकतेंच करण्यांत आलें. ह्या कामासाठी खर्च झालेले ४ लाख रुपये नेपाळ परत देणार आहे. टेलिफोन्स चालू स्थितींत ठेवण्यासाठी ४ भारतीय तंत्रज्ञहि खाटमांडूला ठेवण्यांत आले आहेत. तंत्रज्ञांचे पगार कोलंबो योजनेप्रमाणें भारत देणार आहे.

**लेनिनग्रॅड वस्तुसंग्रहालयाला भेट**—लेनिनग्रॅड येथील हर्मिटेज वस्तुसंग्रहालयाला हस्तीदंतावर नक्षीकाम केलेला एक पडदा पं. नेहरूंनीं भेट म्हणून दिला आहे. पडद्याला तीन फळ्या असून त्यावर भारतीय वनस्पतींची वेलबुट्टी काढण्यांत आली आहे. पडदा एका भारतीय कारागिरानें तयार केला असून तो मखमलीच्या पेटींत ठेवण्यांत आला आहे.

**टाइपरायटर्सचें उत्पादन**—भारतीय सरकारनें देशांत दरवर्षी ३३,००० टाइपरायटर्स तयार करण्याच्या कार्यक्रमास मंजुरी दिली आहे. मुंबई, कलकत्ता व मद्रास ह्या प्रत्येक शहरांतील एक-एक कंपनी मिळून इतके टंकलेखक तयार करतील. ह्यांपैकीं एक कंपनी तर भारतीय भाषांतील टाइपरायटर्सहि तयार करण्याचा विचार करीत आहे.

**ग्रामीण भागांतील पाणीपुरवठा**—ग्रामीण भागांतील लोकांना पाणीपुरवठा करण्याच्या योजनांना मदत म्हणून भारतयि सरकारच्या आरोग्यखात्यानें आणखी १·५ कोटी रुपयांची रक्कम मंजूर केली आहे. आतांपर्यंत ह्या कामासाठी भारतामधील निरनिराळ्या राज्यांना मिळून ४८९·७१ लाख रुपये देण्यांत आले आहेत. नव्यानें दिलेल्या मदतींत मुंबई राज्याला २० लाख रुपये मिळणार आहेत.

**विम्याची रक्कम कुत्र्यासाठी**—अमेरिकेंतील पिट्सबर्ग ह्या ठिकाणाहून न्यूयॉर्कला जाण्यासाठी विमानानें निघालेल्या एका बाईनें आपल्या वैमानिक-प्रवासाच्या पॉलिसीची ३१,२५० डॉलर्सची रक्कम आपल्या कुत्र्याला मिळावी, अशी तरतूद केली होती. सदर स्त्री आपल्या पतीशीं भांडून न्यूयॉर्कला चालली होती.

**नवीन सांस्कृतिक विद्यापीठ**—पौर्वात्य देशांच्या संस्कृतींचें जतन करण्यासाठी एक स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करण्याचा विचार ओरिसा सरकारनें चालविला आहे. हें विद्यापीठ अखिल भारतीय स्वरूपाचें होईल. विद्यापीठ स्थापनेसंबंधीं अहवाल तयार करण्यासाठी १९ जणांची एक कमिटी नियुक्त करण्यांत आली आहे.

**वयस्कर कुमारींना पेन्शन**—इटालिअन पार्लमेंटपुढें पेन्शन-विषयक एक नव्या प्रकारचें बिल सादर करण्यांत येणार आहे. ज्या तरुणींना आपल्यावर अवलंबून असणाऱ्या मातापित्यांचा अगर भावाबहिणींचा संभाळ करावा लागला व त्यामुळें ज्यांचें विवाहाचें वय निघून गेलें आहे, अशांना पेन्शन देण्याची योजना बिलांत आहे. त्याचप्रमाणें विधवा मातांनाहि पेन्शनची सोय करण्यांत येणार आहे.

## सहकाराचें शिक्षण व ट्रेनिंग

### प्रादेशिक शाळांतील सोईंत वाढ

रूरल क्रेडिट सर्व्हे रिपोर्टाचा सर्वसाधारणपणें स्वीकार करण्यांत आल्यामुळें सहकारी चळवळीची मोठ्या प्रमाणावर वाढ होणार आहे. तेव्हां या चळवळीच्या गरजा भागविण्याच्या दृष्टीनें मुंबई सरकारनें सहकाराचें शिक्षण व ट्रेनिंग देण्यासंबंधीची एक खास योजना मंजूर केली आहे.

ही योजना रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या सेंट्रल कमिटी फॉर को-ऑपरेटिव्ह ट्रेनिंगनें स्वीकारली आहे. या योजनेखाली बॉम्बे प्रॉव्हिन्शियल को-ऑपरेटिव्ह इन्स्टिट्यूटतर्फें चालविण्यांत येणाऱ्या तीन प्रादेशिक ट्रेनिंग स्कूलमध्यें एकाच वेळीं सहा महिने मुदतीचे दोन वर्ग चालविण्यांत येतील व प्रत्येक वर्गांत ४० उमेदवारांना प्रवेश देण्यांत येईल. म्हणजे, प्रत्येक शाळेंत दरसाल १६० विद्यार्थ्यांना ट्रेनिंग देण्यांत येईल.

या योजनेनुसार ट्रेनिंग स्कूलच्या नोकरवर्गांत तर वाढ करण्यांत येईलच, पण त्याशिवाय प्रत्येक उमेदवारास दरमहा ४० रुपये विद्यावेतन देण्याचीहि तरतूद करण्यांत आली आहे. तसेंच, प्रत्यक्ष कामाचें शिक्षण घेण्यासाठी उमेदवार बाहेरगांवीं जाईल तेव्हां त्याला प्रवास भत्ता देण्याचीहि तरतूद करण्यांत आली आहे. अशा प्रकारें प्रत्येक उमेदवारास ६० रुपये प्रवास भत्ता देण्यांत येईल.

ज्या सहकारी संस्थांना आपल्या नोकरवर्गापैकीं कांहीं लोकांना ट्रेनिंगसाठी पाठविण्याची इच्छा असेल, त्यांनीं तावडतोब पुढील प्रादेशिक को-ऑपरेटिव्ह ट्रेनिंग स्कूलच्या सुपरिंटेंडेंटांकडे चौकशी करावी. (१) पुणें (१०, बी. जे. रोड) (२) सुरत (३) धारवाड. खाजगी उमेदवारांनाहि प्रवेश देण्यांत येईल. तथापि, सहकारी संस्थांच्या नोकरांना प्रथम पसंति देण्यांत येईल.

---

### मुंबई राज्यांत पांच सहकारी साखर कारखान्यांची स्थापना

मुंबई राज्यांत स्थापन होणाऱ्या पांच सहकारी साखर कारखान्यांची तयारी आतां पुरी झाली असून सदरहू कारखान्यांचीं व्यवस्थापक मंडळें यंत्रें व इतर साहित्याबाबतच्या कोटेशनचा विचार करतील. यावाबतची अधिक माहिती डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीज, ओल्ड कस्टम हाऊस यार्ड, मुंबई १ आणि रजिस्ट्रार ऑफ को-ऑपरेटिव्ह सोसायटीज, सेंट्रल ऑफिस, पुणें १ यांच्याकडे मिळूं शकेल.

---

### वजनदार बीं व बियांचें उत्पन्न

"अर्था" च्या दि. २० जुलैच्या अंकांत पृ. २३३ वर वरील विषयावर माहिती देण्यांत आलेली आहे. त्यांत, 'बियांचें वजन व पिकांचें वजन' ह्या तक्त्याखालील परिच्छेदांत "वरील बाबतींत $\frac{3}{4}$ पौंड वजनाचें बेणें वापरावें असें आम्हीं सुचवितों" असें वाक्य छापलें आहे. '$\frac{3}{4}$ पौंड' ऐवजीं '$1\frac{3}{4}$ पौंड', अशी दुरुस्ती करून तें वाक्य वाचावें.

---

### लोकसभेंतील प्रेक्षक बसण्याच्या जागेंत वाढ

भारतीय लोकसभेंत प्रेक्षक बसण्यासाठी जी गॅलरी आहे, तींत वाढ करून दुप्पट प्रेक्षकांची सोय करण्यांत येणार आहे. सध्या ३०० ते ४०० प्रेक्षक एका वेळीं बसूं शकतात. त्याशिवाय १०० माणसें उभीं राहूं शकतात. गॅलरींत सुधारणा झाली म्हणजे ८०० प्रेक्षकांची सोय होईल.

## कै. ज्ञानदेवराव आप्पाजी सावंत

### आदर्श सहकारी कार्यकर्त्याचें निधन

कोल्हापूर विकासयोजनेच्या सहकारी क्षेत्राचे डि. को. ऑफिसर व निष्ठावंत सहकारी कार्यकर्ते श्री. डी. ए. सावंत हे १७ जुलै रोजीं मृत्यु पावले, हें नमूद करण्यास दुःख होतें. त्यांच्या अकाली निधनानें सहकारी चळवळीचें मोठें नुकसान झालेलें आहे. द. सातारा जिल्ह्यांत कुंडल येथें एका शेतकरी कुटुंबांत त्यांचा जन्म झाला. सहकारी सोसायटीच्या सेक्रेटरीच्या कामापासून त्यांच्या नोकरीस प्रारंभ झाला; कांहीं दिवस त्यांना आसि. रजिस्ट्रारच्या हुद्याच्या जागींहि काम करण्याची संधि मिळाली होती. शेवटचीं कांहीं वर्षे त्यांनीं कोल्हापूरच्या सहकारी सेवेंत खर्च केलीं. त्यांनीं अनेक सहकारी उपक्रमांस प्रोत्साहन दिलें व कार्यप्रवण केलें. त्यांत कुंभी नदी सांगरूळ धरण सहकारी सोसायटीचा व शेतकी सहकारी संघाचा उल्लेख करणें योग्य होईल. सहकारी चळवळीमधील कित्येक सुशिक्षित विद्वानांना साधलें नाहीं, तें श्री. ज्ञानदेवरावांनीं करून दाखविलें. ती गोष्ट म्हणजे, सहकारी चळवळीवरील पुस्तकनिर्मिति. कळकळ, विषय समजावून सांगण्याची हातोटी, सोपी भाषा, इत्यादि त्या पुस्तकांचीं वैशिष्ट्यें सांगतां येतील. त्यांनीं लिहिलेलीं कांहीं पुस्तकें अद्याप अप्रसिद्ध आहेत.

---

### श्री. भोपटकर ह्यांस मानपत्र

पुणें मर्चंटस् को-ऑपरेटिव्ह बँकेच्या सल्लागार मंडळाचे अनेक वर्षे असलेले अध्यक्ष, श्री. ल. व. तथा अण्णाराव भोपटकर हे बँकेच्या अध्यक्षपदावरून कार्यनिवृत्त झाले आहेत. बँकेच्या स्थापनेपासून त्यांच्या मार्गदर्शनाचा बहुमोल लाभ बँकेला झाला आहे. या त्यांच्या उपकाराचें अंशतः उतराई व्हावें म्हणून बँकेच्या कार्यकारी मंडळानें सोमवार दि. २५-७-१९५५ दिवशीं पुणें महानगरपालिकेचे विगत महापौर श्री. गणपत महादेव नलावडे यांच्या अध्यक्षतेखालीं बँकेच्या वतीनें मानपत्र अर्पण करून त्यांचा गौरव केला.

---

### पंजाब नॅशनल बँक लि.

वरील बँकेस ३० जून अखेर संपलेल्या वर्षी ३९.४ लक्ष रु. नफा झाला. बँकेकडे ८६.१२ कोटी रुपयांच्या ठेवी आहेत. ३१ डिसेंबर, १९५४ रोजींच्या पेक्षा ठेवी १०.४८ कोटींनीं जास्त आहेत. बँकेचें खेळतें भांडवल आतां १०४ कोटींवर गेलें आहे.

### ब्रह्मदेशांतील भिकाऱ्यांची परिषद

ब्रह्मदेशांतील भिकाऱ्यांची एक परिषद येत्या महिन्यांत भरणार आहे. सरकारनें भिकाऱ्यांची स्थिति सुधारावी, ह्या दृष्टीनें परिषदेंत ठराव केले जातील.

---

**वाचनालयविषयक परिषद**—क्यूबामध्यें हवाना ह्या शहरांत, इंटरनॅशनल कॉंग्रेस ऑफ नॅशनल लायब्ररीज जानेवारी १९५६ मध्यें भरणार आहे. भारतातर्फे तिघा जणांचें प्रतिनिधी-मंडळ कॉंग्रेसला उपस्थित राहाणार आहे. कलकत्ता येथील नॅशनल लायब्ररीचे प्रमुख, श्री. केशवन् हे प्रतिनिधी-प्रमुख म्हणून जातील.

**भारतासाठी इराणचें तेल**—इराणमधील तेल कंपनीचें तेल भारतांत विक्रीसाठी येण्याचा संभव आहे. ह्यासंबंधीं वाटाघाटी करण्यासाठी इराणच्या तेल कंपनीचे प्रतिनिधी लवकरच दिल्लीला येणार आहेत. इराणच्या इंटरनॅशनल ऑइल कंपनीशीं झालेल्या कराराप्रमाणें, एकूण उत्पादनाच्या एक अष्टमांश तेल इराणला खुल्या बाजारांत विकतां येतें.

# अर्थ

बुधवार, ता. २७ जुलै, १९५५





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## विमाव्यवसायास राष्ट्रीयीकरणाचा धोका ?

हिंदी विमाव्यवसायाच्या राष्ट्रीयीकरणाची भाषा ऐकूं येऊं लागली आहे, ह्याचें प्रत्यंतर म्हणजे विमा कंपन्यांच्या अध्यक्षांच्या भाषणांतून त्याचा उल्लेख व राष्ट्रीयीकरणामुळें होणाऱ्या तोट्यांचा तपशील हीं दिसून येत आहेत. ह्या राष्ट्रीयीकरणाविषयीं सरकारनें विचारपूर्वक असा कांहीं निर्णय घेतलेला नसला, तरीसुद्धां विमा कंपन्यांच्या चालकांना भीति वाटण्याइतपत कुजबूज चालू आहे. पार्लमेंटच्या काँग्रेस सभासदांच्या बैठकींत पंतप्रधानांनीं ह्या प्रश्नाचा जातां जातां उल्लेख केला होता. "कारखाने सरकारी मालकीचे करण्यास मी उत्सुक नाहीं. पण बँका, विमा कंपन्या आणि खाणी ह्या योग्य वेळीं सरकारी करण्यास मात्र माझी तयारी आहे. हे मूलग्राही महत्त्वाचे व्यवसाय आहेत." अशा शब्दांत पंडितजींनीं विमा व्यवसायाचा जो ओझरता उल्लेख केला, तो विमा कंपन्यांत घबराट उत्पन्न करण्यास पुरेसा होता. इंपीरिअल बँकेच्या राष्ट्रीयीकरणाच्या संदर्भात हा उल्लेख तर विशेष चिंतनीय ठरला, आणि विमा कंपन्यांची पाळी आतां लवकरच येणार कीं काय, अशी भीति निर्माण झाली.

सरकारचें अर्थखातें व प्लॅनिंग कमिशन ह्यांनीं मिळून दुसऱ्या पंचवार्षिक योजनेचा आराखडा तयार केला, त्यांत असें म्हटलें आहे, कीं मूलग्राही उद्योगांचें राष्ट्रीयीकरण किंवा नियंत्रण हीं समाजवादी रचनेंत गृहीतच धरण्यांत आलीं पाहिजेत. सरकारी मालकीच्या क्षेत्रांत अशा उद्योगांची वाढ होत गेली, म्हणजे इतरहि व्यवसायांत ( म्हणजे बँकिंग, विमा व व्यापार ) सरकारनें जरूरीप्रमाणें शिरणें आवश्यक ठरेल. सरकारनें नव्या बँका, विमा-संस्था, इत्यादि काढाव्यात, असा ह्याचा अर्थ होत असेल, तर गोष्ट वेगळी. पण, अस्तित्वांत असलेल्या संस्थांवर त्यामुळें गदा येणार असेल तर मात्र त्यांच्या चालकांत चलबिचल होणें अपरिहार्य होईल.

न्यू इंडिया ॲशुअरन्स कंपनीचे अध्यक्ष, श्री. ए. डी. श्रॉफ, ह्यांनीं हिंदी विम्याच्या धंद्याचें राष्ट्रीयीकरण होणें कसें नुकसानकारक आहे, ह्याचें उत्कृष्ट विवेचन केलें आहे. जनरल इन्शुअरन्सचा धंदा तर राष्ट्रीयीकरणास अत्यंत गैरसोईचा आहे. हिंदी जनरल इन्शुअरन्स कंपन्यांनीं ५० देशांत आपलें बस्तान बसविलें आहे; भारतांतील विम्यांचे हप्त्यांचें उत्पन्न ७ कोटी रुपये, तर भारताबाहेरील हप्त्यांचें उत्पन्न ७½ कोटी रुपये आहे. ह्या व्यवसायांत क्लेमची पूर्तता तातडीनें करण्यास विशेष महत्त्व असतें आणि सरकारी खात्याकरवीं तें कितपत होऊं शकेल, ह्याबद्दल शंकाच आहे. आयुर्विम्याचा विचार केला, तर हे विमा प्रत्येक व्यक्तीच्या गरजेप्रमाणें उतरलेले असतात; शिंप्यानें मापें घेऊन कोट शिवावा, तद्वतच ह्या विम्याचें स्वरूप असतें. अज्ञान, बचतीचा अभाव, विम्याच्या संवयीचा अभाव, इत्यादि अडचणीहि उभ्या आहेत. पोस्टल लाइफ ॲशुअरन्सचा ग्रेटब्रिटनमधील प्रयोग अयशस्वी झालेला आहे; १९२८ मध्यें तो बंद करावा लागला. इतरहि देशांत सरकारी विमा खातीं यशस्वी होऊं शकलीं नाहींत; कारण त्यांनीं विम्याचें संरक्षण दिलें तरी त्याबरोबर विमेदाराची सेवा करावी लागते ती हीं खातीं करूंच शकत नाहींत. विमा कंपन्यांचें स्वरूप बव्हंशीं सहकारी स्वरूपाचें असतें, नफ्यापैकीं ९२½% भाग विमेदारांतच वाटला जातो. हिंदी विमा कंपन्यांनीं बजावलेली कामगिरी लक्षांत घेतली, तर राष्ट्रीयीकरणाची आवश्यकता दिसत नाहीं. हिंदी कंपन्यांचें आयुर्विम्याचें काम युद्धोत्तर काळांत २१४% वाढलें, तर हिंदी पोस्टल विम्याच्या कामांत ह्याच मुदतींत फक्त १६% वाढ झाली. हिंदी कंपन्या आपला परराष्ट्रांतील धंदा वाढवीत आहेत, ही गोष्टहि अत्यंत महत्त्वाची आहे. १९४६–५३ ह्या मुदतींत हें काम तिपटीनें वाढलें आहे. हिंदी कंपन्या आपला व्यवसाय भारतांतहि वाढविण्यास सुसज्ज आहेत व त्याला वावहि भरपूर आहे; अद्याप केवढें तरी क्षेत्र आयुर्विम्याला मोकळें आहे. हे सर्व मुद्दे सरकारला पटत नसतील, तर सरकारनें स्वतःची विमा-संस्था काढून चालवून दाखवावी, असें श्री. श्रॉफ म्हणाले. हें आव्हान समजण्यांत येऊं नये, असाहि त्यांनीं खुलासा केला.

कांहीं हिंदी कंपन्यांचें म्युच्युअल कंपन्यांत रूपांतर होत आहे, हा राष्ट्रीयीकरणाच्या भीतीचाच परिणाम तर नाहीं ? पण त्यापेक्षा अधिक सयुक्तिक कारण, विमेदारांचा हितसंबंध मोठा तर त्यांचे-कडेच व्यवस्थेचीं सूत्रें असावींत, हें तत्त्व दिसतें. म्युच्युअल विमा कंपन्या तरी राष्ट्रीयीकरणांतून सुटतील काय ? औंध म्युच्युअल कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर, श्री. वि. ग. जोशी, ह्यांनींहि आपल्या भाषणांत विमाव्यवसायाच्या राष्ट्रीयीकरणाच्या प्रश्नाचा उल्लेख केला. कांहीं मोठ्या कंपन्यांनीं हप्त्यांचे दर भरमसाट कमी करून, बोनसचे दर अप्रमाण वाढवून व स्टाफ इन्शुअरन्सच्या योजनांचे-द्वारा विम्यांची मोहीम आखून आयुर्विमा क्षेत्रांत खळबळ उडवून दिली. विमेदारांना जुन्या पॉलिसी रद्द करायला लावल्या व नवे विमे पहिल्यापेक्षा कमी दरानें देऊं केले ! सामान्य मनुष्य त्यामुळें गोंधळून गेला व विमा-व्यवसाय हा एक बनवाबनवीचा प्रकार आहे कीं काय, असें वाटण्याइतपत त्याची अवस्था झाली. एकाएकीं असें काय घडलें, कीं ज्यामुळें विमा इतका स्वस्त व्हावा ? ह्या घडामोडींस विटून जाऊन, अनिष्ट स्पर्धा करणाऱ्या दादागिरीपेक्षा सरळ सरकारी नियंत्रणाखालील व मालकीखालील विमा बरा, म्हणजे फसवणुकीची तरी भीति नाहीं, असें त्यास वाटूं लागलें तर नवल नाहीं. हिंदी विमा कंपन्यांच्या चालकांनीं ह्यापासून बोध घ्यावा व जनमत कलुषित होऊं देऊं नये, असा श्री. जोशी ह्यांनीं इशारा दिला. विम्याच्या राष्ट्रीयीकरणाची कल्पना दिल्लीमध्यें मूळ धरण्यास बड्या विमा कंपन्यांच्या कार्यपद्धतीबद्दलची सामान्य मनुष्यास आलेली घृणा, हेंच असलें पाहिजे आणि म्हणून ह्या कंपन्यांच्या चालकांवरच हा प्रतिकूल ग्रह निर्माण होण्याची जबाबदारी पडते, असें म्हणणें चुकीचें ठरणार नाहीं. विमा कंपन्यांचा बहुतेक पैसा सरकारी कर्ज-रोख्यांचे द्वारा सरकारलाच वापरण्यास मिळतो आणि म्युच्युअल कंपन्यांत भागीदारांचाहि हितसंबंध नसतो. योग्य पातळीवरील

स्पर्धेमुळें विमा-व्यवसायांतील नफेबाजीचें प्रमाण नष्ट होत चाललें आहे आणि सरकारचें उद्दिष्ट विमा कंपन्यांची मालकी विमेदारांना दिल्यानेंहि साध्य होण्याजोगें आहे. श्री. जोशी ह्यांनीं लहान-मोठ्या सुव्यवस्थित म्युच्युअल कंपन्यांची बाजू उत्कृष्ट रीतीनें मांडली आहे.

---

## स्टेट बँकेच्या भागावरील डिव्हिडंडचा दर

### समाजवादी धोरण आणि प्रत्यक्ष कृति ह्यांत संपूर्ण एकवाक्यता हवी

स्टेट बँकेचे सर्व भाग आतां रिझर्व्ह बँक धारण करीत आहे. त्यांतील कांहीं भाग जनतेला प्रत्येक १०० रु. च्या भागास ३५० रु. घेऊन विकण्याचें रिझर्व्ह बँकेनें जाहीर केलें आहे. कायद्याला धरूनच हें असलें, तरी तें योग्य आहे का, हा प्रश्न शिल्लक राहातोच. भागावर डिव्हिडंड कोणत्या दरानें दिलें जाईल, ह्याबद्दल कांहींच घोषणा करण्यांत आलेली नाहीं. पण ४% पेक्षा कमी व्याज सुटणारें डिव्हिडंड दिलें गेलें, तर तें नव्या भागदारांना अन्यायाचें होईल व असा अन्याय रिझर्व्ह बँकेकडून केला जाणार नाहीं. तेव्हां, इंपीरिअल बँकेच्या जुन्या दरानेंच, म्हणजे प्रत्येक भागावर १४ ते १६ रु. डिव्हिडंड स्टेट बँक देत राहील, असें गृहीत धरण्यास हरकत नाहीं. तेव्हां, १०० रु. चा भाग ३५० रु. ला म्हणजे २५० रु. वाढाव्यानें विकणें व स्टेट बँकेनें एवढ्या भारी दरानें डिव्हिडंड जाहीर करणें सरकारच्या अंगीकृत समाजवादी धोरणास कितपत धरून होईल, असा एक महत्त्वाचा प्रश्न श्री. वा. पुं. वर्दे ह्यांनीं उपस्थित केला आहे.

गुंतलेल्या रकमेवर ४% व्याज सुटलें तरी डिव्हिडंडचा दर १६% राहिला, तर खासगी उद्योगधंद्यांच्या नफ्यावर टीका करण्याची, त्यांचें उत्पन्न मर्यादित करण्याची भाषा बोलण्याचा अधिकारच कोणाला पोंचत नाहीं, असें श्री. वर्दे ह्यांचें म्हणणें आहे. व्याज किती सुटतें एवढेंच पहावयाचें असेल, तर खासगी उपक्रमांतहि, दर्शनी किंमतीस भाग खरीदणारे कांहीं थोडे वगळले, तर बाकीच्यांच्या डिव्हिडंडची खरी किंमत थोडीच भरत असते, हें विसरून कसें चालेल? नव्या आर्थिक उद्दिष्टांस अनुसरून, सरकार-पुरस्कृत उपक्रमांनीं मार्गदर्शन करणें जरूरीचें आहे. ह्या दृष्टीनें रिझर्व्ह बँकेनें स्टेट बँकेचा १०० रु. चा भाग त्या किंमतीच्या आसपासच विकणें व स्टेट बँकेचें डिव्हिडंड ४ ते ६% ह्याच्यापेक्षा अलीकडे-पलीकडे जाणार नाहीं अशी घोषणा होणें श्रेयस्कर झालें असतें. स्टेट बँकेनें डिव्हिडंड कोणत्या दरानें द्यावें, हें कोठेंच स्पष्ट करण्यांत आलेलें नाहीं. परंतु, रिझर्व्ह बँक स्टेट बँकेचे जे जादा भाग घेतील, त्यावर ४% डिव्हिडंड दिलें जाईल, असें मात्र ठरलें आहे. समजा, रिझर्व्ह बँकेला आपलें भागांचें प्रमाण कायम राखण्यासाठी स्टेट बँकेचे जादा भाग घ्यावयाची पाळी आली, तर ह्या भागांवर ४ रु. डिव्हिडंड व बाकीच्या भागांवर १६ रु. डिव्हिडंड स्टेट बँक जाहीर करील कीं काय? अशी शंका उपस्थित होते.

ह्या संबंधांतील विसंगति श्री. वर्दे ह्यांनीं स्पष्ट केली आहे. स्टेट बँकेकडून रिझर्व्ह बँकेला होणाऱ्या मिळकतींतून इंटिग्रेशन व डेव्हलपमेंट फंड निर्माण करण्यांत यावयाचा आहे व त्यांतून स्टेट बँकेच्या तोट्यांत चालणाऱ्या शाखांना टेकू देण्यांत यावयाचा आहे. म्हणजे, हा फंड कर भरणाऱ्या सामान्य जनतेच्या पैशांतूनच निर्माण व्हावयाचा आहे. पण, खासगी भागदाराला मात्र स्टेट बँकेकडून प्रत्येक १०० रु. च्या भागास १६ रु. डिव्हिडंड मिळत जावयाचें आहे. समाजवादी धोरणाचा व ह्याचा मेळ कसा घालावयाचा? प्रत्येक भागावरील कमाल डिव्हिडंड ६ रु. प्रमाणें मर्यादित करणें व जादा नफा रिझर्व्ह बँकेमार्फत राष्ट्रीय उद्धाराकडे किंवा सरकारकडे वळविणें श्रेयस्कर ठरलें असतें.

रिझर्व्ह बँक भाग विकणार, ते फक्त इंपीरिअल बँकेच्या मूळ भागदारांनाच. तेव्हां, त्यांना पूर्वी मिळत असलेलें डिव्हिडंड मिळत राहाणें योग्य होईल, असा युक्तिवाद मांडतां येण्याजोगा आहे. आतां इंपीरिअल बँकेचें अस्तित्व उरलेलें नाहीं, तिचे भाग रिझर्व्ह बँकेच्या मालकीचे झालेले आहेत, आणि मूळ भागधारकांना नुकसानभरपाई देण्यांत येत आहे, तेव्हां हें प्रकरण येथेंच संपावयास हवें. स्टेट बँक ही अगदीं नवी संस्था आहे. तिच्या पूर्वजांचें भूत गाडलें गेलें पाहिजे. प्रथम खासगी भागदारांचे भाग काढून घ्यावयाचे व त्यांनाच ते पुन: विकावयाचे, हें सयुक्तिक दिसत नाहीं. जनतेचा बँकेशीं संबंध यावयाचा तो सहागार ह्या नात्यानें; ती गोष्ट बोर्डावर लोकांचे प्रतिनिधी नेमून साध्य होण्याजोगी आहे. रिझर्व्ह बँकेचा दाखला येथें उपयोगी पडण्याजोगा आहे. राष्ट्राच्या आर्थिक संसारांतील सरकारचें स्थान व त्याचा आविष्कार, ह्यांची योग्य ती छाननी व तपासणी होऊन त्याचें स्वरूप स्पष्टपणें आखलें जाणें अगत्याचें दिसतें. तूर्त तरी वरील चर्चेचें स्वरूप तात्त्विकच रहाणार; कारण रिझर्व्ह बँक किंवा स्टेट बँक ह्यांनीं घेतलेले निर्णय आतांच बदलण्याची शक्यता नाहीं.


दि

बँक ऑफ महाराष्ट्र लि.

शेड्यूल्ड बँक : स्थापना १९३५

संचालक मंडळ

| | |
|---|---|
| श्री. वा. पुं. वर्दे (अध्यक्ष) | श्री. न. ग. पवार (उपाध्यक्ष) |
| श्री. धों. कृ. साठे | श्री. श्री. गो. मराठे |
| श्री. मा. रा. जोशी | श्री. फ. दो. पद्मजी |
| श्री. मा. वी. शहा | श्री. भा. म. गुप्ते |

शाखा :

अहमदनगर, अमरावती, मुंबई (फोर्ट, गिरगांव, दादर व जव्हेरी बाजार), भिवंडी, चाळिसगांव, धुळें, हरिहर (म्हैसूर सं.), हुबळी, व. हैद्राबाद, जळगांव, कल्याण, कोल्हापूर, कोपरगांव, नागपूर, नाशिक, पनवेल, पुणें (भवानी पेठ, डेकन जिमखाना व खडकी), रत्नागिरी, सांगली, सोलापूर, श्रीरामपूर व ठाणें.

★ किर्लोस्करवाडी येथें ता. १० जुलै १९५५ पासून बँकेची नवीन शाखा सुरू झाली आहे.

मुख्य कचेरी:- थोरले बाजीराव रस्ता, पुणें २.

चिं. वि. जोग, मॅनेजर.

## ‘गरीब माणसांच्या वाहनां’चें उत्पादन

सायकलींच्या जादा उत्पादनासाठी परवाना दिलेल्या योजनांचें व चालू कारखान्यांपैकी एका कारखान्याच्या वाढीचें काम पुरें झालें म्हणजे भारतांत ७,५७,५०० सायकली तयार करण्याची निर्धारित उत्पादनशक्ति प्रस्थापित होईल. सध्यां एकूण निर्धारित-शक्ति प्रतिवर्षी ४,२७,५०० सायकली अशी आहे.

स्वातंत्र्योत्तर काळांत भारतांत सायकलींच्या उत्पादनांत झपाट्यानें वाढ झाली. १९४७ मध्यें सायकल उत्पादनाचा आंकडा ४८,८२७ होता तर १९५४ मध्यें तो वाढून ३,५०,००० झाला असावा असा अंदाज आहे. याच वेळीं सायकलींच्या आयातीचें मान हळूहळू घटत आहे. १९५३–५४ मध्यें ९०,३६२ सायकली आयात करण्यांत आल्या, तर १९४८–४९ मधील हा आंकडा २,६४,३९२. होता. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या मुदतींत ‘गरीब माणसाच्या या वाहनाची’ गरज देशी सायकल धंदा भागवूं शकेल असा अंदाज आहे. भारतीय सायकलींच्या निर्यातीसाठी बाजार-पेठा वाढविल्यास उत्पादन-शक्ति वाढवितां येईल.

सुट्या भागांच्या आयातींतील परावलंबित्व देशी धंद्याकडून हळूहळू कमी करण्यांत येत आहे. सायकल कारखान्यांत दर सायकलीसाठी वापरण्यांत येणाऱ्या आयात केलेल्या सुट्या भागांची किंमत फार कमी, म्हणजे अवघी ५ रुपये व जास्तींत जास्त म्हणजे ३७ रुपये होते. फ्री व्हील्स आणि चेन यांसुद्धां सायकलींच्या सर्व भागांचें उत्पादन आतां भारतांत होऊं लागलें आहे. पूर्ण सायकली तयार करणाऱ्या कारखान्यांव्यतिरिक्त सायकलच्या सुट्या भागांचें उत्पादन करणारे सध्यां २४ कारखाने आहेत. २४ कारखान्यांचें १९५४ मधील एकूण उत्पादन १,१०,००,००० रुपये किंमतीचे झालें. त्यांच्या जोडीस सुटे भाग तयार करणारे लहान कारखानेहि देशांत चालू आहेत. तथापि त्यांची आंकडेवारी ठेवण्यांत येत नाहीं.

## साखर धंद्यांतील कामगार

भारतांत १९५२ सालीं १७० साखर कारखाने होते व त्यामध्यें ९२,००० कामगार नोकरीस होते. कामगारांना मिळणारें किमान वेतन मुंबई राज्यांत द. म. १५ रु. पासून ३० रु. पर्यंत आणि आंध्रमध्यें द. म. ८ रु. पासून रु. २४ आ. ६ पर्यंत वेगवेगळें होतें. उत्तर प्रदेश व बिहार राज्यांत महागाई भत्त्यासुद्धां द. म. ५५ रु. ही रक्कम किमान वेतन म्हणून निश्चित केलेली होती.

कामगारांना मिळणाऱ्या महागाई भत्त्याची रक्कमहि स्थळ-परत्वें वेगवेगळी होती. आंध्र, मद्रास, त्रावणकोर–कोचीन या राज्यांत हा भत्ता राहणीमानाच्या निर्देशांकानुसार दिला जात असे. निर्देशांकांतील दर अंशवाढीस हा दर २ आणे याप्रमाणें भत्त्यांत वाढ होई. ओरिसा, मध्यभारत, मध्यप्रदेश, प. बंगाल भोपाळ व मुंबई या राज्यांत उत्पादनाच्या गटानुसार तो देण्यांत येई व त्याचें प्रमाण द. म. २१ ते ५१ रु. १२ आणे याप्रमाणें वेगवेगळें होतें.

ऊंस पिकविणाऱ्या देशांत जगांत क्यूबानंतर भारताचा क्रम लागतो. तथापि ह्यासंबंधीं खरी वाढ १९३२ मध्यें संरक्षण मिळाल्यानंतरच झाली. १९३२ मध्यें ३३,९०० कामगार नोकरींत असलेले ३१ कारखाने होते, तर १९५६ मध्यें ९१,९९७ कामगार नोकरींत असलेले १७० कारखाने होते.

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.
सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई ४.
बँकेचे सर्व व्यवहार केले जातात
अधिकृत भांडवल रु. १०,००,०००
वसूल झालेलें भांडवल रु. ७,२९,०००
रिझर्व रु. ६,०५,६००
ठेवी रु. १,२५,००,०००
शाखा — दादर, माहीम, बेळगांव, पुणें.

उत्तर प्रदेश व बिहार राज्यांत मिळूनच एकूण कारखान्यांपैकी ६८ टक्के कारखाने व सुमारें ७५ टक्के कामगार आहेत. या धंद्यांचीं इतर महत्त्वाचीं राज्यें म्हणजे मुंबई, आंध्र व मध्यभारत हीं होत.

ऊंस गाळणीचा हंगामहि बिहारमध्यें १२१ ते १८३ दिवस, तर आंध्रमध्यें तो सर्वांत कमी म्हणजे ५६ ते ९३ दिवस आढळून आला. कांहीं थोडे तांत्रिक, कारकून व कांहीं कामगार वगळल्यास हंगामाच्या अखेरीस बहुतेकांना नोकरींतून कमी करण्यांत येतें.

## चहाच्या कंपन्यांचें डिव्हिडंड

१९५४ हें वर्ष चहाच्या कंपन्यांना फारच चांगलें गेलें. ब्रिटिश कंपन्यांनीं कितीहि नफे लपविले, तरीसुद्धां नफ्यांत व डिव्हिडंडमध्यें मोठी वाढ दिसून येते. कांहीं कंपन्यांचे तुलनात्मक आंकडे येथें दिले आहेत:—

| | डिव्हिडंड | |
|---|---|---|
| १९५४ अखेरचें वर्ष | १९५३ | १९५४ |
| | % | % |
| सिलोन : | | |
| लुनावा | १५ | २५ |
| स्टँडर्ड टी ऑफ सिलोन | २७½ | ५० |
| सिलोन टी प्लँटेशन्स | २७½ | ५० |
| पाकिस्तान : | | |
| मझदेहे टी | ३० | ५० |
| सिल्हेट | १५ | ५० |
| भारत : | | |
| कॉन्स टी अँड लँड | १० | ३० |
| अमालगमेटेड | ५ | ११¼ |

**अणुशक्तीच्या साह्यानें वीज**—फ्रान्सनें अल्जीरिआ ह्या आपल्या वसाहतींत अणुशक्तीच्या साह्यानें वीज उत्पन्न करण्याचें केंद्र उभारण्याचें ठरविलें आहे. अल्जीरिआंत विजेचा खप दरवर्षी १० टक्क्यांनीं वाढत आहे. ह्या वसाहतीला अधिक प्रमाणांत विजेचा पुरवठा करण्याच्या योजनेनुसार वरील केंद्र स्थापन करण्यांत येणार आहे.

**माणेकजी दादाभाई ह्यांची मालमत्ता**—भारताच्या स्वातंत्र्यपूर्व कौन्सिल ऑफ स्टेटचे अध्यक्ष, श्री. माणेकजी दादाभाई, हे १९५३ सालीं निधन पावले. त्यांनीं ब्रिटनमध्यें सुमारें ४१,००० पौंडांची मालमत्ता केली होती. त्यांच्या निधनानंतर त्यांच्या वारसांना २६,७३० पौंड वारसा कर द्यावा लागला.

## अमेरिकेंतील एकतृतीयांश लोक ४५ वर्षांच्या पेक्षा अधिक वयाचे

### दीर्घायुष्याचे सामाजिक परिणाम

" वार्धक्य " आणि वार्धक्याच्या उतरत्या काळांतील लोकांची सामाजिक आणि आर्थिक स्थिति यासंबंधींच्या अमेरिकन विचारसरणींत दोन वर्षांमध्यें निर्णायक स्वरूपाचा बदल घडून आलेला आहे.

अर्थातच नवीन आहारशास्त्र आणि वैद्यशास्त्र यांच्यामुळें अमेरिकन लोकांच्या आयुमर्यादेंत जी वाढ झाली आहे, तिच्यामुळें हा बदल घडून आला आहे हें उघडच आहे.

सुमारें पन्नास वर्षांपूर्वी सर्वसाधारण अमेरिकन माणसाची जीवनमर्यादा ५० वर्षांच्या आंत होती. पण आतां ती मर्यादा ७० वर्षांपर्यंत वाढली आहे.

याचा परिणाम असा झाला कीं, उतार वयाच्या लोकांची संख्या आतां वाढूं लागली आहे. ४५ वर्षें किंवा त्यापेक्षा अधिक वय झालेल्या अमेरिकन लोकांची संख्या १९०० मध्यें १८ टक्के इतकी होती. हीच संख्या १९५२ मध्यें २९ टक्के इतकी झाली आणि ती संख्या सारखी वाढतच आहे.

६५ व्या वर्षी माणसानें निवृत्त व्हावें असें सर्वसाधारणपणें समजलें जातें. परंतु आज अमेरिकेंत ४५, ५५ किंवा ६५ वर्षें वय झालेलीं माणसें त्या वयांतील त्यांच्या पूर्वजांपेक्षा शारीरिकदृष्ट्या अधिक सुदृढ, मानसिकदृष्ट्या अधिक तल्लख आणि अधिक आरोग्यसंपन्न आहेत.

अमेरिकन लोकांच्या वयमानांत झालेला हा बदल मूलगामी असा आहे; आणि त्याचे सामाजिक परिणाम खोलवर आणि विस्तृत पसरले आहेत.

### सेवानिवृत्तीचें वय

कामगारसंघांचेंच उदाहरण घ्या. ६५ व्या वर्षी कामगारांची सेवानिवृत्ति सक्तीची करण्याऐवजीं ऐच्छिक करण्याच्या योजनेला चारपांच वर्षांपूर्वी कामगार–संघ विरोध करीत असत. ६५ व्या वर्षी सेवानिवृत्त होणें हा कामगारांचा हक्क आहे, असा त्यावेळीं कामगार–संघाचा आग्रह असे.

गेल्या दोन–तीन वर्षांत कामगार–संघांनीं जे सामुदायिक सौदाचे हजारों करार केले, त्यांत सेवानिवृत्तीच्या काळांतील वेतनाच्या योजना निश्चित करण्यांत आल्या आहेत. त्यानंतर, आतां मात्र कामगार–संघांनीं आपला सेवानिवृत्तीच्या वयाबाबतचा दृष्टिकोन बदलला आहे. कामगारांनीं केलेल्या अनेक करारांत आतां सेवानिवृत्तीबाबतच्या अनेक " सैल " स्वरूपाच्या योजना अंतर्भूत करण्यांत आल्या आहेत. या योजनांनुसार वयाच्या ६५ व्या वर्षी नोकरींतून निवृत्त होणें किंवा नोकरी चालू ठेवणें हा प्रश्न कामगारांच्या इच्छेवर सोपविण्यांत येतो. एका विशिष्ट कामगारानें सेवानिवृत्त झालेंच पाहिजे अशी सक्ति आतां नसते. कामगार–संघ आपल्या करारांत ही गोष्ट पुढें तरी ढकलतात किंवा तिचा मुळीं उल्लेख करीत नाहींत.

वयाच्या ६५ व्या वर्षी जोमदार असलेल्या स्त्री–पुरुषांना सेवानिवृत्तीची सक्ति करणें म्हणजे त्यांना सेवेनंतरचें सुख आणि बक्षिस देण्याऐवजीं वैफल्य आणि सजा देण्यासारखें आहे असा दृष्टिकोन आतां सर्वत्र मान्य होत आहे. सेवानिवृत्तीचे नियम लवचिक असावेत आणि सेवानिवृत्ति प्रत्येकाच्या आरोग्याला आणि इच्छेला धरून असावी असें आतां मानलें जातें.

सक्तीनें सेवानिवृत्त होण्याच्या प्रश्नावर वॉशिंग्टन येथील अमेरिकेच्या मजूरखात्यानें बरेंच संशोधन केलें आहे. कामगार–संघ आणि मालक यांना अधिक माहिती पुरविण्यासाठी हें संशोधन करण्यांत आलें.

आतां, आरोग्य, शिक्षण आणि स्वास्थ्य–खात्याच्या सहकार्यानें मजूर–खातें अधिक प्रभावी अशी योजना हातीं घेत आहे. तारुण्यावर अधिक भर देण्याची अमेरिकेची परंपरा आहे. पण त्याच्याच जोडीला परिपक्वता, विश्वसनीयता, जबाबदारीची जाणीव आणि निर्णयशक्ति या गुणांना मान्यता मिळवून देण्यासाठी ही योजना हातीं घेण्यांत आली आहे.

### नवे प्रश्न व दृष्टिकोन

नोकर नोकरीवर ठेवतांना एकतर्फी वयमर्यादा विचारांत घेण्याची पद्धत आतां मानसशास्त्रीयदृष्ट्या व शारीरिकदृष्ट्या जुनाट आणि टाकाऊ ठरली आहे, असें प्राथमिक स्वरूपाच्या अभ्यासावरून आढळून आलें आहे. दुसरीहि एक गोष्ट अशी आहे कीं, अमेरिकेच्या एकूण लोकसंख्येपैकी एकतृतीयांश लोक ४५ पेक्षा अधिक वयाचे आहेत. त्यामुळें जे लोक खात्रीलायक आणि अनुभवी असूनहि त्यांचें वय मोठें आहे म्हणून त्यांना वगळून फक्त तारुण्यावरच भर देणें म्हणजे मनुष्यबळाची नासाडी होय. अनेक मालकांना ही गोष्ट आतां पटली असून ते या नव्या दृष्टिकोनांतून नवीन नेमणुका करूं लागले आहेत. परंतु आणखी अनेकांना ही गोष्ट पटावयाची आहे.

त्याचप्रमाणें, सेवानिवृत्तीच्या जवळ आलेल्या कामगाराला सेवानिवृत्तीचे फायदे न गमावतां एक नोकरी सोडून दुसरी धरणें अनेकदां कठीण जातें. हा एक अत्यंत कठीण असा प्रश्न आहे आणि विशेषतः सबंध देशाला मनुष्यबळाची टंचाई भासत असतांना हा प्रश्न तसाच राहूं देणें दुप्पट अन्याय्य आहे.

सेवानिवृत्त झालेल्या कामगाराची आर्थिक परिस्थिति सुधारणें हा संघ सरकारच्या वार्धक्यकालीन विमा योजनेचा आणि सेवानिवृत्ति–वेतनांच्या खाजगी योजनांचा उद्देश आहे. परंतु सेवानिवृत्तीच्या जवळपास आलेल्या नोकरांना आपल्या तरुण सहकाऱ्यांप्रमाणेंच मोकळेपणानें कोणतीहि नोकरी पत्करणें कसें शक्य करून द्यावें, हा एक नवीन प्रश्न आतां निर्माण झाला आहे.

### संशोधन चालू

हा आणि अशासारखे इतर प्रश्न सोडविण्यास मदत करण्यासाठी मजूरखातें पंचवार्षिक संशोधन सुरू करीत आहे. या संशोधनासाठी काँग्रेसनें खास आर्थिक साहाय्य आणि अधिकार दिले आहेत. उतार वयांत कामगारांमध्यें कार्यक्षमता आणि परिपक्वता किती असते हें पाहाण्यासाठी हें संशोधन करण्यांत येत आहे.

याशिवाय, वयमान, कार्यक्षमता आणि कामगारांना नोकरीवर घेण्याच्या पद्धति यांमध्यें जो नवीन दृष्टिकोन रूढ होत आहे तो विचारांत घेऊन निवृत्तिवेतनाचे हप्ते आणि वेतनश्रेणी नव्यानें ठरविण्याची विनंति मजूरखात्यातर्फे विमा, गणितशास्त्रज्ञ आणि विमा कंपन्यां यांना करण्यांत येणार आहे.

या संशोधनाचे निकाल हातीं आले म्हणजे आणि निवृत्तिविम्याचें नवीन परिशिष्ट तयार झालें म्हणजे अमेरिकन लोकांच्या वयमानाला धरून नोकऱ्या देण्याची आणि निवृत्त होण्याची नवीन योजना आंखतां येईल अशी मजूर खात्याला आशा वाटत आहे.

## नव्या तेल कंपनींत मध्यवर्ती सरकारचें भांडवल

आसाममध्यें खनिज तेलाचा शोध करण्यासाठी आसाम ऑईल कंपनी आणि भारतीय सरकार ह्यांच्या दरम्यान एक करार करण्यांत येऊन एक संयुक्त कंपनी स्थापन करण्याचें ठरलें आहे. आसाम राज्याच्या लखीमपूर जिल्ह्यामधील ४५० चौरस मैल क्षेत्रांत कंपनी तेलाचा शोध करणार आहे. दिग्बोई हें आसाममधील ठिकाण तेलाच्या उत्पादनासाठी प्रसिद्धच आहे. त्या ठिकाणाहून २२ मैलांवर ६ विहिरी खोदण्यांत आल्या असून त्या यशस्वीहि झाल्या आहेत. भांडवल-उभारणीच्या बाबतींत असें ठरविण्यांत आलें कीं, भारतीय सरकारनें एकूण भांडवलापैकीं एकतृतीयांश भांडवल पुरवावें आणि बाकीचें दोनतृतीयांश आसाम ऑईल कंपनीनें पुरवावें. पेट्रोलच्या संशोधनाकरितां प्रथम २० वर्षे मुदतीचा करार करण्यांत आलेला असून त्यानंतर आणखी तेवढ्याच काळ कराराची मुदत वाढविण्याची सवलत ठेवण्यांत आली आहे. खनिज तेलाच्या संशोधनासाठी पूर्वी जे नियम होते त्याप्रमाणें ६० वर्षांचा करार करावा लागत असे. पण सरकारनें नियमांत दुरुस्ती करून २० वर्षे मुदतीचे करार करण्याचे अधिकार घेतले आहेत. नव्या कंपनीबाबत आसाम ऑईल कंपनीशीं झालेला करार पूर्वीच्या अशा प्रकारच्या करारापेक्षा बराच भिन्न असून ह्यापुढें होणाऱ्या करारांचा तो एक प्रकारचा नमुना ठरेल, असें मध्यवर्ती मंत्री श्री. के. डी. मालवीय ह्यांनीं सांगितलें. कंपनीचें भांडवल रुपयांतच उभारण्यांत येणार आहे. कंपनीची संघटना करतांना अधिकांत अधिक भारतीय नोकर कामावर ठेवण्यांत येतील. भांडवलांत खाजगी व्यक्तींना सहभागी होतां येणार नाहीं.

---

## रेल्वे-वहातुकीसाठी लागणारें साहित्य

भारतामधील रेल्वे-वहातुकीला लागणारें साहित्य अजूनहि मोठ्या प्रमाणावर परदेशांतून आयात करावें लागतें. शक्य असेल तर हें सर्व देशांतच तयार करण्याचा सरकारचा विचार असून ह्या बाबतची शक्याशक्यता अजमावण्यासाठी रेल्वे इन्क्वायरी कमिटी नेमण्यांत आली आहे. कमिटीनें मुंबई व दक्षिण भारत ह्या भागांतील आपला दौरा पुरा केला असून नुकतीच ती आतां कलकत्त्याला गेली आहे. कलकत्ता येथें दि एंजिनिअरिंग असोसिएशन ऑफ इंडिआ, डायरेक्टर ऑफ ऑर्डिनन्स फॅक्टरीज, इत्यादि संस्थांच्या प्रतिनिधींशीं कमिटीच्या सभासदांनीं चर्चा केली. चर्चेच्या वेळीं कमिटीचे अध्यक्ष श्री. बी. कोटक म्हणाले कीं, दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत भारतीय रेल्वेनें १,५०० कोटी रुपये खर्च करण्याचें ठरविलें आहे. ह्या काळांत देशांतील रेल्वेंना १,५०,००० मालवहातुकीचे डबे, १२,००० प्रवासी डबे आणि ३,००० एंजिनें लागतील. त्याशिवाय इतर कितीतरी प्रकारचा माल लागेल, तो निराळाच. भारतीय उद्योगपतींना रेल्वेकडून येणाऱ्या ह्या मागणीच्या रूपानें मोठी संधि प्राप्त झालेली आहे. तिचा फायदा त्यांनीं घेतला पाहिजे. आपल्या चालू असलेल्या कारखान्यांची उत्पादनक्षमता वाढविण्याचे आणि नवीन कारखाने काढण्याचे प्रयत्न त्यांनीं केले पाहिजेत. असें झालें तरच भारतीय रेल्वेंना लागणारी सामुग्री देशांतल्या देशांतच उपलब्ध होण्याची शक्यता आहे. कलकत्ता येथील आपल्या मुक्कामांत कमिटीचे सभासद हे स्थानिक उद्योगपती, निरनिराळ्या व्यापारी-संघांचे प्रतिनिधी आणि रेल्वेच्या मागण्या पुरविणारे कारखानदार ह्यांच्याशीं अधिक चर्चा करणार आहेत.

## भारतामधील सिनेमाचा धंदा

म्हैसूर राज्यामधील सिनेमाच्या धंद्यांत काम करणाऱ्या लोकांची परिषद् कांहीं दिवसांपूर्वीं भरली होती. राज्यांतील सिनेमा एम्प्लॉईज असोसिएशनचे अध्यक्ष, श्री. शिवप्पा, ह्यांनीं परिषदेचें अध्यक्षस्थान स्वीकारलें होतें. सिनेमा-एम्प्लॉयर्स असोसिएशनचे उपाध्यक्ष, श्री. व्यंकटेश, ह्या प्रसंगीं बोलतांना म्हणाले कीं भारतामधील सिनेमाचा धंदा हा कापड गिरणीच्या धंद्याखालोखाल मोठा आहे. ह्या धंद्यांत ७ लाख लोक काम करीत आहेत. सरकारनें देशाच्या प्रगतीसाठीं ज्या योजना आंखल्या आहेत त्यांचा प्रचार करण्यासाठी सिनेमाचा महत्त्वाचा उपयोग होईल. असें असूनसुद्धां धंद्यासाठीं लागणारी जवळ जवळ सर्व कच्ची फिल्म व यांत्रिक साहित्य अजून परदेशांकडून आयात करावीं लागतात. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत धंद्याला लागणाऱ्या कच्च्या मालाचें व यांत्रिक सामुग्रीचें उत्पादन करण्याची व्यवस्था होणें जरूर आहे. त्याचप्रमाणें, नवीन सिनेमागृहेंहि बांधण्याची व्यवस्था व्हावयास हवी. हा औद्योगिक विभाग सार्वजनिक मालकीचा असावा. आज भारतामधील सिनेमाच्या धंद्यांत राबणाऱ्या लोकांची स्थिति शोचनीय आहे. ह्या धंद्यांतील भांडवलदारांची वृत्ति पाहातां कामगारांना नोकरीची शाश्वति प्राप्त करून देण्यासाठी धंद्याचें राष्ट्रीयीकरण करण्याखेरीज दुसरा उपाय दिसत नाहीं. कामगार-विषयक कायदेकानूंच्या कक्षेंत ह्या धंद्यांतील कामगारांनाहि सरकारनें त्वरित आणावें. म्हैसूरचे मजूरमंत्री, श्री. रामचंद्र राव, ह्यांनीं कच्ची फिल्म निर्माण करण्याचा कारखाना काढण्याचा विचार मध्यवर्ती सरकार करीत आहे असें सांगितलें. म्हैसूर राज्यांत सुमारें १७५ सिनेमागृहें आहेत.


---

## द. सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, लि., सांगली

या बँकेच्या 'इस्लामपूर' शाखेचा उद्घाटन समारंभ नामदार एम्. पी. पाटील, सहकार मंत्री, मुंबई राज्य, यांचे हस्तें रविवार दिनांक २४ जुलै, १९५५ रोजीं सकाळीं ९ वाजतां मोहन टॉकीज, इस्लामपूर, येथें साजरा झाला.


# किर्लोस्कर

## शेंगायंत्रें



कल्याण शेंगायंत्र

कल्याण पॉवर शेंगायंत्र चालविण्यास ६-८ अश्वशक्तीचें एंजिन लागतें. दर एक तासास ७५-८० पोती शेंग फोडली जाते.

—अधिक माहिती मागवा—

किर्लोस्कर बंधु, लि., किर्लोस्करवाडी

## राइस मिलिंग कमिटीच्या शिफारसी

### पंचवार्षिक कार्यक्रम

हातसडीच्या तांदळाचा धंदा त्वरेनें संघटित करण्यासाठी आणि त्याच विकासासाठी टप्प्याटप्प्यानें अंमलांत आणावयाच्या निरनिराळ्या राज्यांसाठी एक पंचवार्षिक कार्यक्रम कमिटीनें अहवालांत सूचित केला आहे. ग्रामीण पण पाहणीविषयक अहवालांत शिफारस केल्याप्रमाणें भात सडण्यासाठी व त्याची विक्री करण्यासाठी सहकारी पद्धतीचा अंगिकार करावा अशी सूचना कमिटीनें केली आहे. पुरेसा पुरवठा होणें आणि जास्तींत जास्त बेकार व कमी रोजगारी असणाऱ्या ग्रामीण मजुरांस कामधंदा मिळवून देणें या दोन गोष्टी मार्गदर्शक म्हणून पुढें ठेवाव्यात.

प्रत्येक राज्यानें केलेल्या प्रगतीचा आढावा भारत सरकारनें तीन वर्षानंतर घेण्याची शिफारसहि कमिटीनें केली आहे.

गिरण्यांनीं तांदुळाला सड देण्याचें प्रमाण कमाल पांच टक्के किंवा किमान ३ टक्के असावें अशी शिफारस कमिटीनें केली आहे. आयात तांदळाच्या बाबतींतहि हेंच प्रमाण शक्यतों पाहिलें जावें. तथापि निर्यातीसाठी असलेल्या तांदळाच्या बाबतींत मात्र या मर्यादेची सूट देण्यांत यावी.

### आवश्यक ते कायदे

सदर अहवालांत दिलेल्या विविध शिफारशी अंमलांत आणणें राज्य सरकारांना शक्य व्हावें म्हणून १९५५ इसेन्शिअल कमोडिटीज ॲक्टांत व जरूर तर राज्यघटनेंतहि योग्य ते फेरफार करावेत, असें मत कायदेविषयक उपाययोजनांबाबत या कमिटीनें व्यक्त केलें आहे.

हातसडीच्या तांदळाच्या पोषणमूल्यावर भर देऊन हा तांदूळ लोकप्रिय करण्यासाठी शाळा, कॉलेजें, समाज विकास योजना व राष्ट्रीय विस्तार संघटना, गट, महिला संघटना, रेड क्रॉस या ठिकाणीं प्रचार व प्रसिद्धि करण्याच्या आवश्यकतेवर आणि दृकश्राव्य साधनांच्या वापरावरहि या कमिटीनें भर दिला आहे.

हातसडीची अधिक चांगल्या प्रकारचीं व सुटसुटीत अवजारें तयार करण्यासाठीं संशोधन करण्यांत यावें, राज्य सरकारांच्या सहकारी खात्याच्या नियंत्रणाखाली एक स्वतंत्र यंत्रणा उभारावी आणि मध्यवर्ती सरकार व राज्य सरकारें या दरम्यान संबंध राखण्यासाठी खास यंत्रणा उभारावी या संबंधींहि सदर कमिटीनें शिफारशी केल्या आहेत.

या कमिटीनें डाळ सडण्यासंबंधीं अशाच स्वरूपाच्या शिफारशी केल्या आहेत.





म्यूच्युअल कंपन्यांत सर्वांत अधिक बोनस वाटणारी महाराष्ट्रांतील अग्रेसर विमा कंपनी ! !

दि सेन्ट्रल म्यूच्युअल लाईफ इन्शुअरन्स कं. लि.

हयातींतील विम्यास : दरसाल दर हजारीं रु. ७
हयातीनंतरच्या विम्यास: „ „ „ रु. ९

ठिकठिकाणीं प्रतिनिधी नेमणें आहेत.

६७ अपोलो स्ट्रीट फोर्ट, मुंबई — शं. न. आगाशे, मॅनेजिंग डायरेक्टर

दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लि.
( शिडयूल्ड बँक )
प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग
पुणें २. ( टे. नं. २७६३ )

अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल रु. १०,००,०००
जमा झालेलें भांडवल रु. ७,२४,९१०
खेळतें भांडवल रु. ७५,००,०००

मुंबई शाखाः—कॉमनवेल्थ बिल्डिंग, ८२, मेडोज स्ट्रीट, मुंबई १

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. वा. ग. बापट, उपाध्यक्ष.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

श्री. गो. धों. जोगळेकर बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर.
श्री. सी. टी. चितळे मॅनेजिंग डायरेक्टर. टे. नं. २६०७


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२१ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ), पुणें ४, येथें प्रसिद्ध केलें.